

नागपूर : बैठकीत उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे व सारथी ट्रस्टचे पदाधिकारी.

# 'शिवभोजन थाळी केंद्र' तृतीयपंथीयांना

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २५ : राज्यातील तृतीयपंथीयांना असलेल्या घटनादत्त अधिकाराचे संरक्षण व्हावे, शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहचाव्यात या उदात्त हेतूने नागपूर येथे एक शिवभोजन थाळी केंद्राचे प्रातिनिधिक स्वरुपात संचालन करण्याची संधी जिल्हा प्रशासनाने त्यांना दिली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, सारथी ट्रस्टच्यावतीने निकुंज जोशी व तृतीयपंथीयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तृतीयपंथींयांबाबत अजूनही सामाजिक न्यायाच्या दृष्टीने व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे. त्यांना वेळेवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, संजय गांधी निराधार योजनेसह इतर योजनांचा लाभ त्यांना मिळावा, यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे संबंधित विभागाशी समन्वय साधला जात आहे. प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये त्यांच्यासाठी प्राधान्याने व्यवस्था व्हावी, याबाबत नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी दिले.